**A**

2011

Code : **BMW**

प्रश्नपुस्तिका क्रमांक **103101**

BOOKLET No.

# प्रश्नपुस्तिका

## सामान्य अध्ययन व बुद्धिमापन चाचणी, यंत्र अभियांत्रिकी, स्वयंचल अभियांत्रिकी संबंधित चालू घडामोडी

वेळ : 1 (एक) तास

एकूण प्रश्न : 100

एकूण गुण : 100

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

केंद्राची संकेताक्षरे ↑     ↑ शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

ब) **आयोगाने ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे. त्या विषयाचा प्रत्येक प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात आला आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अथवा अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची अचूक उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

SEAL

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

https://www.freshersnow.com/

1. सध्या महाराष्ट्राची नेमबाजीमधील 'सुवर्णकन्या' म्हणून कोणाला ओळखले जाते ?

(1) अंजली भागवत (2) तेजस्विनी सावंत

(3) भाग्यश्री ठिपसे (4) भाग्यश्री बिले

At present who is known as the 'Golden Girl' of Maharashtra in the field of shooting ?

(1) Anjali Bhagwat (2) Tejaswini Sawant

(3) Bhagyashree Thipase (4) Bhagyashree Bile

---

2. तेलंगन विषयासाठी नेमलेल्या समितीचे नाव काय ?

(1) श्रीकृष्ण (2) महाजन

(3) रेड्डी (4) नागराजन

Which Committee is appointed for Telangan issue ?

(1) Shri Krushna (2) Mahajan

(3) Reddy (4) Nagrajan

---

3. नोव्हेंबर 2010 मध्ये निवडून आलेल्या, बिहारमधील नवीन मुख्यमंत्र्याचे नाव सांगा.

(1) सुशील कुमार मोदी (2) नितीश कुमार

(3) लालूप्रसाद यादव (4) रामविलास पासवान

Name the New Chief Minister of Bihar, who is elected in Nov. 2010.

(1) Sushil Kumar Modi (2) Nitish Kumar

(3) Lalu Prasad Yadav (4) Ramvilas Pasvan

---

4. 47 व्या महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कार सोहळ्यामध्ये कोणत्या चित्रपटाची उत्कृष्ठ मराठी चित्रपट म्हणून निवड झाली ?

(1) श्वास

(2) विहिर

(3) मी शिवाजीराजे भोसले बोलतोय

(4) हरिश्चंद्राची फॅक्टरी

Which cinema is selected as a best Marathi cinema during $47^{th}$ Maharashtra State Marathi film festival ?

(1) Swas

(2) Wihir

(3) Mi Shivajiraje Bhosale Boltoya

(4) Harischandrachi Factory

---

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK



https://www.freshersnow.com/

5. सचिन तेंडूलकर यांना मानद ग्रूप कॅप्टन म्हणून लष्कराच्या कोणत्या दलाने मान्यता दिली आहे ?

(1) तटरक्षक दल (2) भूदल

(3) नौदल (4) हवाईदल

Which defence force has approved Sachin Tendulkar as a Honorary Group Captain ?

(1) Coast Guard (2) Army

(3) Navy (4) Air Force

---

6. नाटो या संघटनेची 2010 मधील सभा ________________ मध्ये पार पडली.

(1) स्पेन (2) रशिया

(3) पोर्तुगाल (4) अफगाणिस्तान

The 2010, Summit of NATO meeting was held in ________________

(1) Spain (2) Russia

(3) Portugal (4) Afghanistan

---

7. सन् 2010 हे वर्ष संयुक्त राष्ट्र संघटनेकडून ______________ वर्ष म्हणून घोषित करण्यात आले आहे.

(1) जागतिक साक्षरता

(2) पर्यावरण रक्षण

(3) आंतरराष्ट्रीय जैव विविधता

(4) दहशतवादविरोधी

The year 2010 is declared as the year of ________________ by UNO.

(1) World literacy

(2) Protection of environment

(3) International Bio-diversity

(4) Anti terrorism

---

8. सोशल नेटवर्किंगमुळे हजारो युवक तहरीर चौकात जमा झाले तो कोणत्या शहरात आहे ?

(1) कैरो (2) त्रिपोली

(3) बगदाद (4) मस्कत

By social networking the thousands of youth organized at Tarrir Square is placed in which city ?

(1) Cairo (2) Tripoli

(3) Bagdad (4) Muscat

---

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

https://www.freshersnow.com/

**9.** ज्योतिबा फुले यांनी आपला 'गुलामगिरी' हा ग्रंथ ________________ यांना समर्पित केला.

(1) सामाजिक न्यायासाठी लढा देणारे भारतीय

(2) गुलामांना स्वातंत्र्य करण्यासाठी लढा देणारे अमेरिकन

(3) राज्यक्रांतीसाठी लढा देणारे फ्रेंच

(4) भारतात सामाजिक न्यायासाठी लढा देणारे ब्रिटीश

Jyotiba Phule dedicated his book 'Gulamgiri' to those ________________

(1) Indians, who had fought for social justice

(2) Americans, who had fought to free slaves

(3) Frenchmen, who had fought for revolution

(4) British, who had fought for Indian social justice

---

**10.** औद्योगिक संशोधनासाठी भारत सरकारने 1940 साली ________________ ही संस्था स्थापन केली.

(1) टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च

(2) कौन्सिल फॉर सायन्टिफिक ॲण्ड इंडस्ट्रियल रिसर्च

(3) भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटर

(4) इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी

For industrial research, in 1940, the Government of India established ____________

(1) Tata Institute of Fundamental Research

(2) Council for Scientific and Industrial Research

(3) Bhabha Atomic Research Centre

(4) Indian Institute of Technology

---

**11.** राजा रवि वर्मा हे प्रख्यात ________________ होते.

(1) कादंबरीकार (2) जादूगार

(3) तैल चित्रकार (4) कवी

Raja Ravi Varma was a famous ______________

(1) Novelist (2) Magician

(3) Oil painter (4) Poet

---



https://www.freshersnow.com/

12. ऐतिहासिक दृष्ट्या 1761-1999 या काळात भारताच्या औद्योगिक विकासाचे ढोबळपणे ________ प्रमुख कालखंड दाखवता येतील.

(1) सात (2) सहा

(3) चार (4) पाच

Historically, during 1761-1999, Industrial Development of India can grossly be divided into ________ periods.

(1) Seven (2) Six

(3) Four (4) Five

---

13. इ.स. 1854 मध्ये भारतात सर्व प्रथम ________ येथे सूतगिरणी अस्तित्वात आली.

(1) अहमदाबाद (2) नागपूर

(3) मुंबई (4) सूरत

In 1854, the first cotton mill in India was set up in ________

(1) Ahamedabad (2) Nagpur

(3) Mumbai (4) Surat

---

14. ज्या क्षेत्रावर शासनाची मालकी, नियंत्रण असून व्यवस्थापनही शासन करते त्यास ________ म्हणतात.

(1) संयुक्त क्षेत्र (2) खाजगी क्षेत्र

(3) सार्वजनिक क्षेत्र (4) सहकारी क्षेत्र

The sector which owned, controlled and managed by the states, is known as ________

(1) Joint sector (2) Private sector

(3) Public sector (4) Co-operative sector

---

15. इ. स. ________ मध्ये भारताने आर्थिक उदारिकरणाचे 'नवे अर्थविषयक धोरण' स्वीकारले.

(1) 1991 (2) 1951

(3) 1978 (4) 1981

In ________, India adopted a 'New Economic Policy' under which the economy was liberalized.

(1) 1991 (2) 1951

(3) 1978 (4) 1981

---



https://www.freshersnow.com/

16. 1956 चे औद्योगिक धोरण ______________ या समितीच्या शिफारशींवर आधारलेले होते.

(1) जे. सी. कुमारप्पा (2) राम के. वेप्पा

(3) डी. सी. कर्वे (4) अशोक मेहता

Industrial Policy of 1956 was based on the recommendations of the ______________ Committee.

(1) J. C. Kumarappa (2) Ram K. Vepa

(3) D. C. Karve (4) Ashok Mehata

---

17. स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने औद्योगिक धोरण पहिल्यांदा ______________ या वर्षी मान्य केले.

(1) 1949 (2) 1948

(3) 1950 (4) 1952

After independence, the Government of India passed the First Industrial Policy resolution in ______________

(1) 1949 (2) 1948

(3) 1950 (4) 1952

---

18. धरणात साठविलेले पाणी हे ______________ चे उदाहरण आहे.

(1) स्थितिज ऊर्जा (2) गतिज ऊर्जा

(3) अणु ऊर्जा (4) वरीलपैकी नाही

The water stored in dam is an example of ______________

(1) Potential energy (2) Kinetic energy

(3) Atomic energy (4) None of the above

---

19. किरणोत्सारी अणूमधून अल्फा कणाचे निर्गमन होऊन त्याचे नवीन अणुत रूपांतर झाले असता ______________

(1) अणुवस्तुमानांक 4 ने आणि अणुअंक 2 ने कमी होतो

(2) अणुवस्तुमानांक 2 ने आणि अणुअंक 4 ने कमी होतो

(3) अणुवस्तुमानांक 4 ने आणि अणुअंक 2 ने वाढतो

(4) अणुवस्तुमानांक व अणुअंक दोन्ही सारखेच राहतात

When an atom emits $\alpha$-radiation and gets converted into another atom its ______________

(1) Mass number decreases by 4 and atomic number decreases by 2

(2) Mass number decreases by 2 and atomic number decreases by 4

(3) Mass number increases by 4 and atomic number increases by 2

(4) Both mass number and atomic number remains same

---

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK



https://www.freshersnow.com/

20. सुस्पष्ट दृष्टीचे लघुत्तम अंतर ________ असते.

(1) 10 से.मी. (2) 20 से.मी.

(3) 25 से.मी. (4) 30 से.मी.

The least distance of distinct vision is ________

(1) 10 cm (2) 20 cm

(3) 25 cm (4) 30 cm

21. चंद्राला पृथ्वीभोवती एक परिभ्रमण करण्यास ________ दिवस लागतात.

(1) 24 (2) 27.3

(3) 30 (4) 365

The moon takes ________ days to complete one revolution around the earth.

(1) 24 (2) 27.3

(3) 30 (4) 365

22. ________ पासून प्लॅस्टर ऑफ पॅरिस बनवितात.

(1) निरुपयोगी प्लॅस्टर (2) तुरटी

(3) जिप्सम (4) कॉपर सल्फेट

Plaster of Paris is prepared from ________

(1) Dead burnt plaster (2) Alum

(3) Gypsum (4) Copper Sulphate

23. पदार्थाच्या एका ग्रॅम-मोल मधील रेणुंची संख्या ________ इतकी असते.

(1) M (2) N

(3) A (4) X

One gram-mole of a substance contains ________ number of molecules.

(1) M (2) N

(3) A (4) X

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

https://www.freshersnow.com/

**24.** खालीलपैकी असत्य विधान कोणते आहे ?

(1) लायसोसोम फक्त प्राण्यांच्या पेशीतच असतात

(2) बेडकाच्या पिल्ल्याचे (tadpole) बेडकात रूपांतर होत असताना त्याच्या शेपुटाचे पचन लायसोसोम द्वारे केल्या जाते

(3) लायसोसोम ही पेशीची 'मल निस:रण संस्था' आहे

(4) लायसोसोम हे पेशीत असलेल्या कार्बोहायड्रेट्स व भेद यांचे ऑक्सिश्वसन करतात

Which one of the following is not true ?

(1) Lysosomes are present only in animal cells

(2) When tadpole transforms into frog, the tail is digested by Lysosomes

(3) Lysosome is the cell's waste disposal system

(4) Lysosomes oxidise carbohydrates and fats, present in the cells

---

**25.** ________________ ही पाण्यात विरघळणारी जीवनसत्त्वे आहेत.

(1) A, B व K (2) A व C

(3) A, B व D (4) B व C

________________ are water soluble vitamins.

(1) A, B and K (2) A and C

(3) A, B and D (4) B and C

---

**26.** मधुमेह विकारामध्ये ________________ चा वापर केला जातो.

(1) इंटरफेरॉन (2) इन्सुलिन

(3) एरिथ्रोपायेटिन (4) सोमाटोस्टॅटिन

In diabetic condition ________________ is used.

(1) Interferon (2) Insulin

(3) Erythropoietin (4) Somatostatin

---

**27.** भारतामध्ये ________________ या वर्षी इंग्रजी हे शिकवण्याचे माध्यम म्हणून चालू करण्यात आले.

(1) 1834 (2) 1835

(3) 1850 (4) 1857

In the year ________________ English was made the medium of instruction in India.

(1) 1834 (2) 1835

(3) 1850 (4) 1857

---

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK



https://www.freshersnow.com/

28. भारतामध्ये रेल्वेची सुरुवात झाली त्यावेळेस भारताचे गव्हर्नर जनरल ______________ हे होते.

(1) लॉर्ड रिपन
(2) लॉर्ड डलहौसी
(3) लॉर्ड कर्झन
(4) लॉर्ड कॅनिंग

__________________ was the Governor General of India when railways were introduced in India.

(1) Lord Rippon
(2) Lord Dalhousie
(3) Lord Curzon
(4) Lord Canning

---

29. 1857 चे 'स्वातंत्र्य समर' हा ग्रंथ ______________ यांनी लिहिला.

(1) मोतीलाल नेहरु
(2) महात्मा गांधी
(3) वि. दा. सावरकर
(4) विनोबा भावे

'The War of Indian Independence 1857' the book was written by ____________

(1) Motilal Nehru
(2) Mahatma Gandhi
(3) V. D. Savarkar
(4) Vinoba Bhave

---

30. मुंबई–ठाणे हा पहिला रेल्वे मार्ग केव्हा सुरु झाला ?

(1) 1855
(2) 1853
(3) 1857
(4) 1856

When did the First Mumbai-Thane Railway line started ?

(1) 1855
(2) 1853
(3) 1857
(4) 1856

---

31. स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या चतु:सूत्रीचे पुरस्कर्ते कोण होते ?

(1) महात्मा गांधी
(2) गो. कृ. गोखले
(3) लोकमान्य टिळक
(4) सुभाषचंद्र बोस

Who was the proponent of the Four-point formula (Chatuhsutri) : Self Government (Swaraj), Use of Domestic Products (Swadeshi), Boycott (Bahiskar) and National Education (Rashtriya Shikshan) ?

(1) Mahatma Gandhi
(2) G. K. Gokhale
(3) Lokmanya Tilak
(4) Subhashchandra Bose

---

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

https://www.freshersnow.com/

32. 'गुलामगिरी' हा ग्रंथ कोणी लिहिला ?

(1) न्यायमूर्ती रानडे (2) भाऊ दाजी लाड

(3) महात्मा ज्योतिबा फुले (4) र. धो. कर्वे

Who wrote the book 'Gulamgiri' ?

(1) Justice Ranade (2) Bhau Daji Lad

(3) Mahatma Jyotiba Phule (4) R. D. Karve

---

33. ________________ हे 1857 च्या उठावाच्या वेळेस भारताचे गव्हर्नर जनरल होते.

(1) लॉर्ड डलहौसी (2) लॉर्ड कॉर्नवॉलीस

(3) थॉमस मुन्रो (4) लॉर्ड कॅनिंग

______________ was the Governor General of India when 1857 revolt broke out.

(1) Lord Dalhousie (2) Lord Cornwallis

(3) Thomas Munro (4) Lord Canning

---

34. प्रमुख शेतीविषयक उठावांपैकी 1875 चा दख्खनचा उठाव हा ____________ येथे घडला.

(1) पुणे आणि सांगली

(2) मुंबई आणि पुणे

(3) पुणे आणि अहमदनगर

(4) अहमदनगर व मुंबई

Deccan riots of 1875 were major agrarian revolt in _________________

(1) Poona and Sangli

(2) Mumbai and Poona

(3) Poona and Ahmednagar

(4) Ahmednagar and Mumbai

---

35. 2001 च्या जनगणनेनुसार भारतात सर्वात कमी लोकसंख्या __________ राज्यात आहे.

(1) सिक्किम (2) केरळ

(3) महाराष्ट्र (4) मेघालय

As per the 2001 census __________ state of India has the lowest population.

(1) Sikkim (2) Kerala

(3) Maharashtra (4) Meghalaya

---

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK



https://www.freshersnow.com/

**36.** मुंबई बंदरावरील माल वाहतूकीचा ताण कमी करण्यासाठी __________ येथे नवीन बंदर विकसित केले आहे.

(1) हल्दिया (2) न्हावा-शेवा

(3) मार्मागोवा (4) कांडला

The new port is developed at __________ for reducing burden of goods transportation in Mumbai port.

(1) Haldia (2) Nava-Sheva

(3) Marmagao (4) Kandla

---

**37.** बहुस्तरीय वाढ हे __________ वनस्पतीचे वैशिष्ट्य आहे.

(1) निमसदाहरित (2) शुष्क सदाहरित

(3) आर्द्र सदाहरित (4) पानझडी

Multilayered growth is the characteristic of __________ vegetation.

(1) Semi-evergreen (2) Dry-evergreen

(3) Wet-evergreen (4) Deciduous

---

**38.** __________ या दिवशी द्वैभाषिक मुंबई राज्य अस्तित्वात आले.

(1) 1 डिसेंबर 1957 (2) 1 नोव्हेंबर 1956

(3) 26 जानेवारी 1958 (4) 15 ऑगस्ट 1947

Bilingual province of Mumbai came into existence on __________

(1) 1 Dec. 1957 (2) 1 Nov. 1956

(3) 26 Jan. 1958 (4) 15 Aug. 1947

---

**39.** दक्षिण भारतातील कोणत्या नदीच्या खोऱ्यातील जलसंसाधन सर्वात मोठे आहे ?

(1) कृष्णा (2) पेरियार

(3) गोदावरी (4) कावेरी

Which river basin is the largest water resource of Southern India ?

(1) Krishna (2) Periyar

(3) Godavari (4) Kaveri

---

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

https://www.freshersnow.com/

40. महाराष्ट्राचा ________ जिल्हा गुजरात व मध्यप्रदेश या राज्यांच्या सीमेवर आहे.

(1) नाशिक (2) धुळे

(3) जळगांव (4) बुलढाणा

________ district of Maharashtra is located on the boarder of Gujarat and Madhyapradesh.

(1) Nashik (2) Dhule

(3) Jalgaon (4) Buldhana

---

41. नैसर्गिक वायूचे सर्वात जास्त उत्पादन ________ येथे होते.

(1) मुंबई हाय (2) नाझिरा

(3) दिग्बोई (4) कोयाली

Natural gas is produced at ________ on a large scale.

(1) Mumbai High (2) Nazira

(3) Digboi (4) Koyali

---

42. महाराष्ट्र राज्यात मान्सूनपूर्व पर्जन्यास ________ म्हणतात.

(1) आम्रसरी (2) कॉफी बहार सरी

(3) कालबैसाखी (4) आँधी

The pre monsoon showers in Maharashtra are called ________

(1) Mango Showers (2) Coffee Blossoms

(3) Kalbaisakhi (4) Aandhi

---

43. पुढीलपैकी कोणता अधिकार मूलभूत अधिकारात मोडत नाही ?

(1) भाषण स्वातंत्र्य

(2) समानतेचा हक्क

(3) मालमत्तेचा अधिकार

(4) स्वत:च्या पसंतीचा धर्म स्वीकारण्याचा हक्क

Which one of the following is not the fundamental right ?

(1) Freedom of speech

(2) Right to equality

(3) Right to property

(4) Right to follow the religion of one's choice

---

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK



https://www.freshersnow.com/

44. मुंबई उच्च न्यायालयाची खंड पीठे कोठे-कोठे आहेत ?

(1) औरंगाबाद नागपुर नासिक

(2) औरंगाबाद नागपुर पणजी

(3) मुंबई नागपुर पणजी

(4) मुंबई पणजी नासिक

Where are Mumbai High Courts benches ?

(1) Aurangabad Nagpur Nasik

(2) Aurangabad Nagpur Panjim

(3) Mumbai Nagpur Panjim

(4) Mumbai Panjim Nasik

---

45. भारतीय राज्यघटनेच्या विभाग 3 मधील कलम ___________ मध्ये 'स्वातंत्र्याच्या अधिकाराची' तरतूद केली आहे.

(1) 36 ते 51 (2) 29 ते 30

(3) 19 (4) 32 ते 35

The provision to 'right to freedom' is situated in the part 3 and article _________ of the Indian constitution.

(1) 36 to 51 (2) 29 to 30

(3) 19 (4) 32 to 35

---

46. सरकारी विधेयकाचा आराखडा ___________ तयार करतात.

(1) मंत्री

(2) संसदीय सचिव

(3) लोकसभेचा सभापती

(4) राज्यसभेचा सभापती

The draft of Government Bill is prepared by _________

(1) A Minister

(2) The Parliamentary Secretary

(3) The Speaker of the Lok Sabha

(4) The Speaker of the Rajya Sabha

---

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

https://www.freshersnow.com/

47. महाराष्ट्रात नगरपरिषदाची किती वर्गात विभागणी केली आहे ?

(1) 4 (2) 3

(3) 2 (4) 1

Municipal Council in Maharashtra is divided in ________ categories.

(1) 4 (2) 3

(3) 2 (4) 1

---

48. __________ साली भारतीय संसदेने 'भारतीय - नागरिकत्वाचा कायदा' संमत केला.

(1) 1949 (2) 1976

(3) 1955 (4) 1952

The Parliament of India passed 'The Citizenship Act of India' in the year ________

(1) 1949 (2) 1976

(3) 1955 (4) 1952

---

49. पुढीलपैकी कोणता कर राज्यसरकार लादते ?

(1) उत्पादन शुल्क (2) आयकर

(3) महामंडल कर (4) जमीन महसूल

Which of the following is a State Government Tax ?

(1) Custom duty (2) Income tax

(3) Corporation tax (4) Land Revenue

---

50. खाजगी विधेयक म्हणजे

(1) की जे विधेयक पंतप्रधानांनी मांडले

(2) की जे विधेयक मंत्र्याने मांडले

(3) की जे विधेयक मंत्र्याव्यतिरिक्त सदस्याने मांडले

(4) की जे विधेयक सामान्य माणसासाठी आहे

Private bill means

(1) Which was placed by Prime Minister

(2) Which was placed by Minister

(3) Which was placed by member of Parliament other than Minister

(4) Which bill for common people

---

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK



https://www.freshersnow.com/

51. पुढील समीकरणामधील 'A' आणि 'B' ची किंमत काढा.

$$\frac{36}{A} = \frac{54}{B} = \frac{81}{63}$$

(1) A = 28 B = 42
(2) A = 22 B = 46
(3) A = 42 B = 28
(4) A = 32 B = 44

Find the values of 'A' and 'B' in the following equation.

$$\frac{36}{A} = \frac{54}{B} = \frac{81}{63}$$

(1) A = 28 B = 42
(2) A = 22 B = 46
(3) A = 42 B = 28
(4) A = 32 B = 44

52. खालील प्रश्नामध्ये चौरसातील आठ जागा एका विशिष्ट सूत्राने भरल्या आहेत. ते सूत्र ओळखा व त्या आधारे खालील चार पर्यायांमधून प्रश्न चिन्हाच्या जागी येणारी संख्या शोधा.

| | | |
|---|---|---|
| 36 | 64 | 81 |
| 49 | 100 | ? |
| 121 | 144 | 169 |

(1) 16
(2) 9
(3) 225
(4) 196

In the following question 8 of the 9 cells are filled according to some rule. Find the missing number from the four alternatives given below.

| | | |
|---|---|---|
| 36 | 64 | 81 |
| 49 | 100 | ? |
| 121 | 144 | 169 |

(1) 16
(2) 9
(3) 225
(4) 196

53. वृक्षांच्या रांगेत एक वृक्ष दोन्ही बाजूंकडून 5 वा आहे. तर त्या रांगेत किती वृक्ष आहेत ?

(1) 8
(2) 9
(3) 10
(4) 11


In a row of trees, one tree is fifth from either end of the row. How many trees are there in the row ?

(1) 8
(2) 9
(3) 10
(4) 11

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

https://www.freshersnow.com/


**54.** खालील प्रश्नामध्ये वर्तुळाच्या भोवती असलेल्या अंकांचे संबंध शोधून प्रश्न चिन्हाच्या जागी कोणता अंक येईल तो पर्यायामधून निवडा.




(1) 256 (2) 225

(3) 676 (4) 324

Observe the given number relation around the circle and find out the number in the place of the question mark.




(1) 256 (2) 225

(3) 676 (4) 324

---

**55.** जर स्वातंत्र दिवस रविवारी येत असेल तर येणारा प्रजासत्ताक दिवस कोणत्या दिवशी येईल ?

(1) रविवार (2) बुधवार

(3) शुक्रवार (4) गुरुवार

If independence day falls on Sunday, the coming Republic Day will fall on

(1) Sunday (2) Wednesday

(3) Friday (4) Thursday

---

**56.** शिर्षासन करीत असतांना स्वप्नीलची पाठ पश्चिम दिशेला होती. तर त्याचा उजवा हात कोणत्या दिशेला राहिल ?

(1) पश्चिम (2) दक्षिण

(3) पूर्व (4) उत्तर

While doing Shirsasan, Swapnil's back faced west. In which direction would his right hand be ?

(1) West (2) South

(3) East (4) North

---



https://www.freshersnow.com/

**57.** प्रश्नाकृतीची पाण्यातील प्रतिमा कशी दिसेल ते पर्यायामधून शोधा.

| LNS |
|---|

(1) ΓNƧ (2) LИƧ
(3) ΓИƧ (4) ƧИΓ

Find the correct water image from the alternatives.

| LNS |
|---|

(1) ΓNƧ (2) LИƧ
(3) ΓИƧ (4) ƧИΓ

---

**58.** एक माणूस पश्चिमेला 30 मीटर्स चालत गेला. नंतर उजवीकडे वळून तो 30 मीटर्स गेला. त्यानंतर त्याच्या डावीकडे वळून तो 20 मीटर्स गेला. पुन्हा डावीकडे वळून तो 30 मीटर्स गेला. तो त्याच्या सुरुवातीच्या जागेपासून किती अंतरावर आहे ?

(1) 20 मीटर्स (2) 30 मीटर्स
(3) 50 मीटर्स (4) यापैकी नाही

A man walks 30 metres towards west. Then, turning to his right, he walks 30 metres. Then, turning to his left, he walks 20 metres. Again, he turns to his left and walks 30 metres. How far is he from his initial position ?

(1) 20 metres (2) 30 metres
(3) 50 metres (4) None of these

---

**59.** जर इंग्रजी बाराखडी मधील S ते Y ही अक्षरे उलट्या क्रमाने लिहिल्या गेली तर शेवटून दुसरे अक्षर कोणते ?

(1) R (2) T
(3) S (4) Y

If letters from S to Y are written in reverse order, which is second last letter ?

(1) R (2) T
(3) S (4) Y

---

**60.** आजपासून दोन दिवसानंतर क्रिस्मस आहे. क्रिस्मसला रविवार आहे. तर आजपासून दोन दिवसांअगोदरचा दिवस कोणता ?

(1) सोमवार (2) रविवार
(3) गुरुवार (4) शनिवार

Two days after today is Christmas. Christmas falls on Sunday. What was the day two days before today ?

(1) Monday (2) Sunday
(3) Thursday (4) Saturday

---

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

https://www.freshersnow.com/

61. पाच मुली रांगेत बसल्या आहेत. राशी ही सुलेखा किंवा आभाच्या शेजारी बसलेली नाही. अनुराधा ही सुलेखाच्या शेजारी नाही. राशी ही मोनिकाच्या शेजारी बसली आहे. मोनिका ही रांगेच्या मध्यभागी आहे. तर अनुराधा कोणाच्या शेजारी बसली आहे ?

(1) राशी
(2) सुलेखा
(3) आभा
(4) मोनिका

Five girls are sitting in a row. Rashi is not adjacent to Sulekha or Abha. Anuradha is not adjacent to Sulekha. Rashi is adjacent to Monika. Monika is at the middle in the row. Then, Anuradha is adjacent to whom out of the following ?

(1) Rashi
(2) Sulekha
(3) Abha
(4) Monika

62. एका माणसाचा परिचय करून देताना ती स्त्री म्हणाली, "यांची पत्नी ही माझ्या वडिलांची एकुलती एक मुलगी आहे." त्या पुरुषाचे स्त्रीशी नाते काय ?

(1) पती
(2) भाऊ
(3) सासरा
(4) यापैकी नाही

Introducing a man, a woman said, "His wife is the only daughter of my father." How is that man related to the woman ?

(1) Husband
(2) Brother
(3) Father-in-law
(4) None of these

63. प्रश्नार्थक चिन्हाच्या ठिकाणी येणारा आकडा सांगा.

| | | |
|---|---|---|
| 27 | 9 | 15 |
| 22 | 4 | 12 |
| 5 | ? | 3 |

(1) 5
(2) 6
(3) 3
(4) 2

Find the number in place of question mark.

| | | |
|---|---|---|
| 27 | 9 | 15 |
| 22 | 4 | 12 |
| 5 | ? | 3 |


(1) 5
(2) 6
(3) 3
(4) 2



कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK





https://www.freshersnow.com/


64. दिलेल्या पर्यायातून योग्य आकृती निवडून आकृत्यांचा क्रम पूर्ण करा.







(1)  (2) 

(3)  (4) 

Complete the following series of figures by selecting appropriate option.



(1)  (2) 

(3)  (4) 

65. एका सांकेतिक भाषेत 'dom pul ta' म्हणजे 'bring hot food', 'pul tir sop' म्हणजे 'food is good', and 'tak da sop' means 'good bright bay', तर त्या भाषेत 'hot' कसे लिहिले जाईल ?

(1) dom (2) put

(3) ta (4) ठरवता येत नाही

In a certain code language, 'dom pul ta' means 'bring hot food', 'pul tir sop' means 'food is good', and 'tak da sop' means 'good bright bay'. Which of the following does mean 'hot' in that language ?

(1) dom (2) put

(3) ta (4) cannot be determined

66. एक मुलगा ताशी 6 किमी वेगाने घरापासून शाळेपर्यंत चालतो तो ताशी 2 किमी वेगाने परत घरी चालत येतो तर त्याचा चालण्याचा सरासरी वेग किती ?

(1) ताशी 8 किमी (2) ताशी 3 किमी

(3) ताशी 4 किमी (4) ताशी 5 किमी

A boy walks from his home to school at 6 kmph. He walks back at a speed of 2 kmph. His average speed is

(1) 8 kmph (2) 3 kmph

(3) 4 kmph (4) 5 kmph

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

https://www.freshersnow.com/

67. जर POT, TEA, PET, PEN हे शब्द 274, 431, 234, 235 असे लिहिले जात असतील तर TAPE हा शब्द कशाप्रकारे लिहिता येईल ?

(1) 4123 (2) 2471

(3) 4234 (4) 4231

The words POT, TEA, PET, PEN are written as 274, 431, 234, 235 respt. How will the word TAPE be written ?

(1) 4123 (2) 2471

(3) 4234 (4) 4231

---

68. 4 टक्के मीठ असलेल्या 7 लिटर समुद्राच्या पाण्यामधून 1 लिटर पाण्याचे बाष्पीभवन झाल्यास उरलेल्या द्रावणात मिठाचे प्रमाण काय असेल ?

(1) 4% (2) 4.33%

(3) 4.5% (4) 4.66%

One litre of water is evaporated from 7 litres of sea water containing 4% salt. The % of salt in the remaining of solution is

(1) 4% (2) 4.33%

(3) 4.5% (4) 4.66%

---

69. खालील संख्याक्रम पूर्ण करण्यासाठी योग्य पर्याय निवडा.

5, 9, 17, 29, 45, ________

(1) 60 (2) 65

(3) 68 (4) 70

Complete the following number series by selecting appropriate option.

5, 9, 17, 29, 45, ________

(1) 60 (2) 65

(3) 68 (4) 70

---

70. पाच व्यक्ती रांगेत उभ्या आहेत. रवी राजनच्या पुढे नाही. रेखा सर्वात पुढे आहे. राजन राहुलच्या मागे आहे. रेणू रवीच्या मागे आहे. राजन रेणूच्या मागे नाही तर रांगेत सर्वात शेवटी कोण आहे ?

(1) राजन (2) रवी

(3) राहुल (4) रेणू

Five friends are standing in a row, Ravi is not ahead of Rajan. Rekha is in the front. Rajan is behind Rahul. Renu is behind Ravi. Rajan is not behind Renu. Who is at the end of the line ?

(1) Rajan (2) Ravi

(3) Rahul (4) Renu

---

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK



https://www.freshersnow.com/

71. गटात न बसणारी जोडी बाजूला काढा.

(a) चंद्रगुप्त : मौर्य
(b) बाबर : मुघल
(c) कनिष्क : कुशन
(d) महावीर : जैन

(1) (a) (2) (b)
(3) (c) (4) (d)

Choose the odd pair of words.

(a) Chandragupta : Maurya
(b) Babar : Mughal
(c) Kanishka : Kushan
(d) Mahavira : Jainism

(1) (a) (2) (b)
(3) (c) (4) (d)

---

72. प्रत्येक बाजू 3 सेंमी लांबीची असलेल्या घनाकृतीला सर्व बाजूंनी लाल रंग दिला आहे. ही घनाकृती कापून तिचे 1 सेंमी लांबीचे घन ठोकळे तयार केले. फक्त एकच बाजू लाल रंगाने रंगविली आहे. असे किती ठोकळे असतील ?

(1) 4 (2) 6
(3) 1 (4) 9

A 3 cm cube has been painted red on all its sides. It is cut into one cm cubes. How many cubes will be there with only one side red ?

(1) 4 (2) 6
(3) 1 (4) 9

---

73. गटात न बसणारा शब्द शोधा.

(a) नायजर
(b) सुवेझ
(c) मिसिसीपी
(d) कोलोरॅडो

(1) (a) (2) (b)
(3) (c) (4) (d)

Choose the odd one out.

(a) Niger
(b) Suez
(c) Mississippi
(d) Colorado

(1) (a) (2) (b)
(3) (c) (4) (d)



---


कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

https://www.freshersnow.com/

**74.** खालील प्रश्न हा दिलेल्या आकृत्यांवर आधारित आहे. खालील प्रश्नामध्ये दिलेल्या तीन गटामध्ये असणारे संबंध दाखविणारी आकृती निवडा.



पुरुष, स्त्रीया, मुली.


(1)   (2) 

(3)   (4) 

Following question is based on the following diagrams. Choose the diagram that illustrates the relationship among three given classes described in the following question.

Male, Female, Girls.

(1)   (2) 

(3)   (4) 

---

**75.** BDF : HIL : : MOQ : ?

(1) XVT  (2) TVX

(3) VTX  (4) TUX

BDF : HIL : : MOQ : ?

(1) XVT  (2) TVX

(3) VTX  (4) TUX

---

**76.** एका गाडीमध्ये 50 कोंबड्या, 45 शेळ्या, 8 उंट आणि काही गुराखी आहेत. जर गाडीमध्ये असलेल्या एकूण डोक्यांपेक्षा 224 पाय अधिक असतील गुराख्यांची संख्या किती ?

(1) 5  (2) 8

(3) 10  (4) 15

In a caravan in addition to 50 hens there are 45 goats and 8 camels with some keepers. If the total number of feet be 224 more than the number of heads in the caravan, the number of keepers are

(1) 5  (2) 8

(3) 10  (4) 15

---



https://www.freshersnow.com/

**77.** योग्य पर्याय निवडून क्रम पूर्ण करा.

हिटलर : जर्मनी तसेच ________

(1) शेक्सपिअर : इंग्लंड (2) तुलसीदास : भारत

(3) मुसोलिनी : इटली (4) बोरिस येल्तसिन : रशिया

Select the correct option to complete the sequence.

Hitler : Germany, ________

(1) Shakespeare : England (2) Tulsidas : India

(3) Mussolini : Italy (4) Boris Yeltsin : Russia

---

**78.** खालील प्रश्नामध्ये नऊ कप्पे असलेले चौरस दिले असून प्रत्येकात आठ कप्पे एका विशिष्ट नियमानुसार संख्या लिहून भरलेले आहेत. त्याच नियमानुसार रिकामा कप्पा भरण्यासाठी योग्य पर्याय निवडा.

| | | |
|---|---|---|
| 81 | 25 | 729 |
| 9 | ? | 125 |
| 512 | 64 | 8 |

(1) 3 (2) 4

(3) 5 (4) 6

Following question there is a square having nine cells. Eight of the cells have been filled in with numbers by using certain rule. Find the correct alternative to fill in the empty cell by the same rule.

| | | |
|---|---|---|
| 81 | 25 | 729 |
| 9 | ? | 125 |
| 512 | 64 | 8 |

(1) 3 (2) 4

(3) 5 (4) 6

---

**79.** 1 एप्रिल 1989 या दिवशी शनिवार होता तर 1975 च्या बालदिनाला कोणता वार होता ?

(1) रविवार (2) शुक्रवार

(3) शनिवार (4) सोमवार

If it was a Saturday on 1st April 1989, what would have been the day on Children's Day of the year 1975 ?

(1) Sunday (2) Friday

(3) Saturday (4) Monday

---

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

https://www.freshersnow.com/

80. योग्य पर्याय निवडा.

मनुष्य : चरित्र : : राष्ट्र : ?

(अ) नेता

(ब) जनता

(क) भूगोल

(ड) इतिहास

(1) (ड) (2) (अ)

(3) (क) (4) (ब)

Select the best alternative.

Man : Biography : : Nation : ?

(a) Leader

(b) People

(c) Geography

(d) History

(1) (d) (2) (a)

(3) (c) (4) (b)

---

81. डी. एन. सी. हे लघुरूप खालील तंत्रासाठी वापरले जाते

(1) डिजिटल न्युमरिकल कंट्रोल

(2) डिस्ट्रिब्यूटेड न्युमरिकल कंट्रोल

(3) ड्युएल न्युमरिकल कंट्रोल

(4) डायनामिक न्युमरिकल कंट्रोल

The abbreviation DNC is used to denote

(1) Digital Numerical Control

(2) Distributed Numerical Control

(3) Dual Numerical Control

(4) Dynamic Numerical Control

---

82. एखाद्या उष्ण पदार्थाचा पृष्ठभाग __________ असल्यास त्यापासून होणाऱ्या उष्णतेचे उत्सर्जन अधिक वेगाने होईल

(1) खरखरीत व पांढरा (2) चमकदार व पांढरा

(3) करडा (4) काळा आणि खरखरीत

A hot body will radiate heat most rapidly if its surface is

(1) Rough and white (2) Polished and white

(3) Grey (4) Black and rough

---

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK



https://www.freshersnow.com/

83. कंप्यूटर एडेड डिझाईन (कॅड) या तंत्रात माहितीच्या आदानप्रदानासाठी कोणत्या संहितेचा वापर केला जातो ?

(1) जी. आय. एफ. (2) पी. डी. एफ.

(3) आय. जी. ई. एस. (4) एम. पी. ई. जी.

Following is the data exchange standard in Computer Aided Design (CAD)

(1) GIF (2) PDF

(3) IGES (4) MPEG

---

84. अल्ट्रासोनिक मशिनिंग तंत्राचा वापर करून खालीलपैकी कुठल्या प्रकारच्या पदार्थावर चांगल्या प्रकारे मशिनिंग करता येऊ शकेल ?

(1) माईल्ड स्टील (2) पितळ

(3) कास्ट आयर्न (4) काच

Which is the most suitable work material that can be machined by ultrasonic machining ?

(1) Mild steel (2) Brass

(3) Cast iron (4) Glass

---

85. ट्रान्सफर मशिन्स हा प्रकार खालीलपैकी कुठल्या उपयोगात वापरतात ?

(1) हार्ड ॲटोमेशन

(2) सॉफ्ट ॲटोमेशन

(3) प्रोग्रामेबल ॲटोमेशन

(4) स्वस्त किंमतीचे ॲटोमेशन

Transfer machines are employed under the application of

(1) Hard Automation

(2) Soft Automation

(3) Programmable automation

(4) Low cost automation

---

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

https://www.freshersnow.com/

86. कार्बन मोनॉक्साईड वायुची पातळी मोडणारे यंत्र खालीलपैकी कोणत्या तत्त्वावर चालते ?

(1) थर्मल कंडक्टीव्हीटी

(2) ऑक्सिजन वायूचे पॅरामॅग्नेटिक गुणधर्म

(3) नॉन डिस्पर्सीव्ह इन्फ्रारेड ॲबसॉर्प्शन

(4) प्रसरण

A carbon monoxide analyser works on the principle of

(1) Thermal conductivity

(2) Paramagnetic properties of $O_2$

(3) Non-dispersive infra-red absorption

(4) Expansion

---

87. पारंपारिक क्रॉस-प्लाय टायर्सच्या तुलनेत रेडियल प्लाय टायर्सचा हा एक तोटा आहे

(1) वाहन हळू असतांना असमाधानकारक कामगिरी

(2) वाहन वेगात असतांना असमाधानकारक कामगिरी

(3) वाहन वळविण्यासाठी लागणारी जास्त शक्ति

(4) घर्षणाच्या कमतरतेमुळे कमजोर पकड

The disadvantage of radial ply tyre compared to cross-ply tyre is

(1) Uncomfortable ride at low speeds

(2) Uncomfortable ride at high speeds

(3) Higher cornering power

(4) Lower rolling resistance

---

88. वाहन घसरून अपघात होऊ नये यासाठी वापरण्यात येणारी यंत्रणा खालील ठीकाणी लावलेली असते.

(1) मागील ब्रेक्स (2) पुढील ब्रेक्स

(3) दुय्यम ब्रेक्स (4) पार्किंग ब्रेक्स

Most anti-skid devices are employed on

(1) Rear brakes (2) Front brakes

(3) Secondary brakes (4) Parking brakes

---

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK



https://www.freshersnow.com/

89. 'पॉईंट टु पॉईंट न्युमरिकल कंट्रोल' या तंत्राचा वापर कोणत्या मशिनटूल मध्ये केला जातो ?

(1) ड्रिलिंग मशीन

(2) ग्राईंडिंग मशीन

(3) मिलिंग मशीन

(4) यापैकी नाही

The machine tool in which point-to-point numerical control system is applied is the

(1) Drilling machine

(2) Grinding machine

(3) Milling machine

(4) None of the above

---

90. ____________ वर आधारित इंजिन पेक्षा इतर कुठलेही इंजिन अधिक कार्यक्षम असु शकत नाही.

(1) डीझल सायकल (2) ड्युएल सायकल

(3) कॉर्नाट सायकल (4) ऑटो सायकल

No engine can be more efficient than the engine working on

(1) Diesel cycle (2) Dual cycle

(3) Carnot cycle (4) Otto cycle

---

91. रेफ्रीजरेटरच्या कंडेन्सरमध्ये प्रवेश करतांना रेफ्रीजरंट पदार्थाची अवस्था खालीलपैकी कोणती असते ?

(1) कमी दाबाचा वायु

(2) जास्त दाबाचा वायु

(3) कमी दाबाचा द्रव

(4) जास्त दाबाचा द्रव

Refrigerant enters the condenser of a mechanical refrigeration system as a

(1) Low pressure gas

(2) High pressure gas

(3) Low pressure liquid

(4) High pressure liquid

---

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

https://www.freshersnow.com/

92. एका सेंट्रीफ्युगल पंख्याला चालवणारी इलेक्ट्रीक मोटर वाजवीपेक्षा जास्त गरम झालेली आढळली यासाठी खालील कारण असु शकेल

(1) पंख्याला चालवणारा बेल्ट ढीला असावा

(2) पंखा सुरू होतांना जास्त ताण आला असावा

(3) पात्यांवर धूळ व तेलाचे थर साचले असावेत

(4) पंख्यांची पाती वाकली असावीत

An electric motor driving a centrifugal air fan is found to be running hot. The most lively cause is

(1) Slack driving belts

(2) Fan starting load is too heavy

(3) Heavy deposits of dust or/and oil

(4) Bent fan blades

---

93. इंजिनचा आवाज कमी करण्यासाठी इंजिनच्या एक्झॉस्ट प्रणालीमध्ये बसवण्यात येणाऱ्या उपकरणास __________ म्हणतात.

(1) एक्झॉस्ट व्हॉल्व (2) एक्झॉस्ट पाईप

(3) टेल पाईप (4) मफलर

The device located in the exhaust system to reduce the exhaust noise is called the

(1) Exhaust valve (2) Exhaust pipe

(3) Tail pipe (4) Muffler

---

94. आधुनिक वाहनांमध्ये स्टेअरिंग __________ या प्रमाणात असते.

(1) 1 : 1 आणि 4 : 1

(2) 4 : 1 आणि 2 : 1

(3) 12 : 1 आणि 24 : 1

(4) 24 : 1 आणि 48 : 1

The steering in the case of modern automobiles varies between

(1) 1 : 1 and 4 : 1

(2) 4 : 1 and 2 : 1

(3) 12 : 1 and 24 : 1

(4) 24 : 1 and 48 : 1

---

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK



https://www.freshersnow.com/

95. किंग पिनची मध्य रेषा आणि उभी रेषा यांच्या मधील कोनाला ________________ म्हणतात.

(1) टो अँगल
(2) किंग पिन अँगल
(3) कॅस्टर अँगल
(4) कँबर अँगल

The angle between the vertical line and the centre line of the king pin is known as

(1) Toe angle
(2) King pin angle
(3) Caster angle
(4) Camber angle

---

96. वाहनांमध्ये क्लचचा प्राथमिक उपयोग __________ हा आहे.

(1) आणीबाणीच्या वेळी ब्रेक म्हणून
(2) रस्त्यावर वेगात वाहन चालवता यावे म्हणून
(3) इंजिनपासून मिळणारी शक्ति हळूवारपणे चाकांपर्यंत पोहोचवता यावी म्हणून
(4) इंजिनचा वेग कमी करता यावा म्हणून

The primary purpose of the clutch in automobiles is to

(1) Act live a brake in case of emergency
(2) Give high speed to the road wheel
(3) Take up the drive smoothly
(4) Decelerate the engine

---

97. पेट्रोल इंधनाचा ऑक्टेन नंबर हा खालीलपैकी कशाचे द्योतक आहे ?

(1) शुद्धता
(2) नॉकींग अवरोध
(3) प्रदूषण पातळी
(4) कार्यक्षमता

Octane number of SI engine fuel is a measure of

(1) Purity
(2) Knock resistivity
(3) Pollution level
(4) Efficiency

---



https://www.freshersnow.com/

98. डायरेक्ट इंजेक्शन डीझल इंजिनचा खालीलपैकी सर्वात महत्त्वाचा फायदा कोणता ?

(1) इंजिन सहज चालु करण्याची सुविधा

(2) वजनात हलके

(3) किंमतीत कमी

(4) जुळणी करण्यास सोपे

Most important advantage offered by Direct Injection (DI) diesel engine is

(1) Easy cold starting

(2) Light weight

(3) Low cost

(4) Easy assembly

---

99. इलेक्ट्रॉनिक इंजिन व्यवस्थापन सुविधा असणाऱ्या सी. आय. इंजिनसाठी कोणती इंधन पुरवठा यंत्रणा सर्वाधिक सोईची आहे ?

(1) युनिट पंप सिस्टीम (2) डिस्ट्रीब्युटर सिस्टीम

(3) कॉमन रेल सिस्टीम (4) असेंब्ली लाईन सिस्टीम

Most suitable fuel supply system for C.I. engines having electronic engine management is ________________

(1) Unit pump system (2) Distributor system

(3) Common rail system (4) Assembly line system

---

100. भारतातील बी एस–2 प्रदूषण नियंत्रण प्रणालीनुसार वाहनाद्वारे सोडल्या जाणाऱ्या कार्बन मोनॉक्साईडची जास्तीतजास्त पातळी एवढी असु शकते.

(1) 2.2 %

(2) 320 पी. पी. एम.

(3) 2.2 ग्राम/कि. मी.

(4) 100 पी.पी.एम.

As per the BS–II emission norms in India, the allowable carbon monoxide level is

(1) 2.2 %

(2) 320 ppm

(3) 2.2 gm/km

(4) 100 ppm

---

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK



https://www.freshersnow.com/

## सूचना – (पृष्ठ 1 वरून पुढे....)

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत: बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षा कक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग – 1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

### नमुना प्रश्न

प्रश्न क्र. 201. सतीची चाल नष्ट करण्यासाठी कोणी मूलत: प्रयत्न केले ?

(1) स्वामी दयानंद सरस्वती
(2) ईश्वरचंद्र विद्यासागर
(3) राजा राममोहन रॉय
(4) गोपाळकृष्ण गोखले

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) राजा राममोहन रॉय" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव **खालीलप्रमाणे** प्र. क्र. 201 समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र.क्र. 201. ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्रीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

SEAL

https://www.freshersnow.com/